जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 DEC 2019
Times of India

## UGC grant to Shivaji university for research

University Grants Commission (UGC) has included Shivaji University for conducting research on India's developing economy. The varsity will get funds of Rs 1 crore under the scheme for 'India's Developing Economy.' The UGC has shortlisted 16 universities from the country for the purpose and Shivaji University is the only educational establishment selected from Maharashtra.

# विद्यापीठात एनएसएस अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण सुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अधिकाऱ्यांच्या आठवडाभराच्या प्रशिक्षण कार्यक्रमास उत्साहात सुरुवात झाली. हा प्रशिक्षण कार्यक्रम दि. ९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून भारत सरकारच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. कार्तिकेयन उपस्थित होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. डी. कार्तिकेयन यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. विविध नियमित कार्यक्रम, शिबिर या विषयी माहिती दिली. सर्व अधिकाऱ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे कसा संवाद साधावयाचा याबाबत माहिती देत असताना माहिती संवाद तंत्रज्ञानाचे आपल्या स्वयंसेवकांसाठी उपयोजन आणि




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अधिकाऱ्यांच्या आठवडाभराच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (छाया : पांडुरंग पाटील)**

आवश्यकता विशद केली. डॉ. निवास देसाई यांनी हवामानातील बदल आणि बदलत्या हवामानाचा मानवी समुदायावर होणारे परिणाम यांची माहिती दिली. हवा आणि हवामानातील बदलांनुसार मानव आणि मानवी समुदाय यांचे वर्तन, कार्य, स्वभाव यांच्यातही बदल होतात, असे त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. माळी पी. आर. यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठात शनिवारी सशस्त्र ध्वज दिनानिमित्त विविध कार्यक्रम : प्र-कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ, छत्रपती संभाजीराजे फाउंडेशन व शहीद जवान स्फूर्ती केंद्र यांच्या वतीने शनिवार (दि. ७) रोजी सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित्त विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार संभाजीराजे छत्रपती, ब्रिगेडियर गोविंद कलवड यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'सशस्त्र सेना दिनानिमित्त विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये देशभक्तीपर गीत गायन, सामाजिक विषयावर आधारित पथनाट्य, वक्तृत्व, चित्रकला, सैनिकांच्या जीवनावर आधारित निबंध स्पर्धा, घोषवाक्य लेखन स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकाच्या विजेत्यांचे सादरीकरण व पारितोषिक वितरण कार्यक्रम होणार आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शहाजी माळी, डॉ. डी. के. गायकवाड व आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात उद्या विशेष व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने औरंगाबादचे उपायुक्त (जीएसटी) रवींद्र जोगदंड यांचे शनिवारी (दि. ७) सकाळी ११ वाजता विशेष व्याख्यान होणार आहे. त्याचा विषय 'स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना' असा आहे. विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाच्या स्मार्ट क्लासरुममध्ये होणाऱ्या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे असतील, अशी माहिती या केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी दिली.

# समाजशास्त्र विभाग व्यवस्थित चालविण्यात सर्व घटकांचे योगदान : डॉ. एस. एन. पवार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र विभाग प्राध्यापकांचे उत्कृष्ट कामकाज, विद्यार्थांच्या सहकार्याने व्यवस्थित चालवू शकलो. यात सर्व घटकांचे योगदान आहे, असे प्रतिपादन समाजशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार यांनी केले. विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्ष उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. माजी विद्यार्थी प्रा. किसन कुऱ्हाडे, विद्यार्थी नवीन राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन पीएच.डी. संशोधिका उज्वला पाटील यांनी केले. प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. आर पाटील, प्रा. डॉ. जे. बी. आंबेकर, प्रा. डॉ. श्रीकांत, प्रा. डॉ. प्रतिभा देसाई, प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यापीठातर्फे आज वडणगे येथे कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** नवीन लघुद्योग, कुटिरोद्योग निर्माण होण्यास प्रोत्साहन व नवी दिशा देण्याच्या हेतूने मौजे वडणगे (ता. करवीर) येथील महिलांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने शुक्रवारी (दि. ६) दुपारी ३ ते ६ या कालावधीत एकदिवसीय कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेत महिलांना उद्योगांसाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षणासंदर्भात माहिती दिली जाणार आहे, यावेळी उपस्थित रहावे, असे आवाहन केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

# विद्यापीठात सोमवारी आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. ९) आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. आचार्य जगदीशचंद्र बोस जयंतीनिमित्त ही कार्यशाळा होणार असून, अमॅच्युअर रेडिओचा सहभाग या विषयावरही एकदिवसीय कार्यशाळा होईल. यात प्रात्यक्षिके व सादरीकरण होणार आहे. सकाळी साडेसात ते साडेनऊपर्यंत व पुन्हा दुपारी चार ते सायंकाळी सहापर्यंत अमॅच्युअर रेडिओच्या सहाय्याने संदेशवहन, आपत्ती व्यवस्थापनासाठी त्याचा उपयोग याबाबतची प्रात्यक्षिके दाखविली जाणार आहेत. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. दत्ता देवगावकर, डॉ. प्रमोद वासंबेकर, डॉ. डी. के. गायकवाड आणि अविनाश गुंडाळे यांचा सहभाग असणार आहे. कार्यशाळेत विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, पालक व संशोधकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.